# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२१६५९२**


जावक क्रमांक : गों.वि./आस्था/9/02/२०१६

दिनांक 25/०७/२०१६

## परिपत्रक

**विषय - माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत.**

संदर्भ :- मा. संचालक, माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. सीआरटीआय-१०१६/केंद्रप्रकल्प-२०१६-१७/प्रशिक्षण, दि. १४/०७/२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयांच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मा. संचालक, माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे यांचे संदर्भीय पत्र विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाले असून सदर पत्रान्वये विद्यापीठातंर्गत जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी त्याचबरोबर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अनुदानीत महाविद्यालयांचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रशिक्षण घेणेसाठी मान्यतेबाबतचे पत्र व सोबतच जिल्हानिहाय जन माहिती अधिकारी व त्यांचे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या परिपुर्ण यादया दिनांक ३० जूलै २०१६ पर्यंत यशदाकडे पाठवण्याबाबत मा. कुलगुरु महोदयानी मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयाशी संबधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची यादी तात्काळ विद्यापीठ प्रशासनाकडे सादर करण्यात यावी.

करीता माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर.

(डॉ. विनायक इरपाते)<br>
कुलसचिव<br>
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- संदर्भीय पत्र

प्रतिलिपी :-

१) मा. कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालय,

E:\Right of information act under matter 2016\yashdha training

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी

(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)

**Yashwantrao Chavan Academy of Development Administration**

(A Government of Maharashtra Organisation)

सत्यमेव जयते

यशदा®

ISO 9001 : 2008


सीआरटीआय-१०१६/केंद्रप्रकल्प-२०१६-१७/प्रशिक्षण
दि. १४/०७/२०१६


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 3453 दि. 16/7/16
जावक क्र. ....... दि. .......


प्रति,
मा. निबंधक,


गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 1869 दि. 16-7-16
जावक क्र. ........ दि. ........


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
मुंबई विद्यापीठ, मुंबई
श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
कवी कुलगुरु कालीदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपुर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली
यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ महाराष्ट्र, नाशिक

**विषय:- माहिती अधिकार अधिनियम, २००५ या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम घेणेबाबत मान्यता व प्रशिक्षणार्थी यादी पाठविण्याबाबत.**

महोदय,

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी(यशदा) पुणे ही महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था आहे. या संस्थेव्दारे प्रामूख्याने शासकीय अधिकारी, यांना प्रशिक्षण दिले जाते. राज्यातील प्रशासनाला प्रशिक्षणाच्या माध्यमातून लोकाभिमुख व सक्षम बनविणे हे संस्थेचे ध्येय असून यशदातील विविध केंद्राव्दारे विकास प्रशासनामध्ये सहभागी प्रशासक, सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापक, स्थानिक स्वराज्यसंस्था, स्वयंसेवी संघटना यांचे पदाधिकार अधिकारी आणि कर्मचारी यांनादेखील प्रशिक्षण, कार्यशाळा व चर्चासत्राच्या माध्यमातून सुयोग्य् ज्ञान व कौशल्येवृध्दी करण्यासाठी निरंतर सहाय्य् केले जाते.

माहितीचा अधिकार कायद्याचा वाढता वापर विचारात घेता त्यानुरुप सर्व शासकीय विभागांअतर्गत कार्यरत अधिकारी-कर्मचा-यांची क्षमतावृध्दी करणे अत्यावश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २६(१) (घ)नुसार विविध सार्वजनिक प्राधिकरणातील अधिका-यांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्मिक व प्रशिक्षण विभाग,(डीओपीटी) भारत सरकार, नवी दिल्ली, (केंद्र शासन) यांनी यशदास सूचित केले आहे.

विद्यापीठातील कार्यरत अधिकारी यांचे विविधांगी प्रशिक्षण विद्यापीठा अंतर्गत नियमीत होतात सोबतच विद्यापीठ अधिनस्त मान्यताप्राप्त् महाविद्यालय अधिकारी व कर्मचारी वर्गासाठीही विविध प्रशिक्षण विद्यापीठामार्फत आयोजीत केले जातात. त्याअनुषंगाने आपल्या विद्यापीठाच्या कार्यकक्षेत असलेले सर्व माहिती अधिकारी व प्रथम


● Excellence Through Training ●

● प्रशिक्षणात् प्राविण्यम् ●

राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे ४११ ००७. भारत (इपीएबीएक्स) : (०२०) २५६०८००० कार्यालयीन वेळेनंतर : २५६०८२७१, फॅक्स : २५६०८१००

Raj Bhavan Complex, Baner Road, Pune 411 007. India (EPABX) : (020) 25608000 After Office Hrs. : 25608271, Fax : 25608100

Email : yashada@vsnl.com contact@yashada.org | Website : www.yashada.org

अपिलीय अधिकारी (विद्यापीठातील आणि अधिनस्त् सर्व महाविद्यालयातील) यांचे करीता माहिती अधिकार अधिनियम-२००५ या विषयावर प्रशिक्षण घेणेबाबत **यशदाच्या वतीने** प्रस्तावित करीत आहोत.

माहिती अधिकार कायद्याप्रती सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा म्हणून २०१६-१७ या वर्षात उच्च् शिक्षण व तांत्रिक शिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठ व त्याअंतर्गत कार्यरत शासकीय अनुदानीत महाविद्यालयातील जन माहिती अधिकारी, त्यांचे प्रथम अपिलीय अधिकारी यांना **"माहिती अधिकार अधिनियम,२००५"** या कायदया संदर्भीय प्रशिक्षण देण्याचा मानस आहे.

यशदामार्फत यापूर्वी महसूल विभाग, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, गृह विभाग या विभागांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करुन प्रशिक्षण दिले आहे. कायद्याची अंमलबजावणी अधिक परिणामकारक व्हावी सर्व प्राधिकरणांच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायीत्व व लोकसभागाची संकल्पना प्रत्यक्षात येऊन कामकाजातील खुलेपणा वाढवा या हेतूत: जिल्हा स्तरावर देखील प्रशिक्षण आयोजित करण्याचे धोरण यशदाने अवलंबले आहे.

**सदर प्रशिक्षणासंबधी अंमलबजावणीची कार्यपध्दती/नियमावली खालील प्रमाणे राहील.**

- यशदा कडून या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन व संनियंत्रण करण्यात येईल.
- सदर प्रशिक्षणासाठी आपल्या विद्यापीठाअंतर्गत कार्यरत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अधिनस्त् सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालयातील जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांची संपुर्ण माहितीसह यादी विद्यापीठ स्तरावरुन **यशदा ला** कळविण्यात येईल.
- प्रशिक्षण हे विद्यापीठाच्या अंतर्गत जिल्हा कार्यक्षेत्रात त्या-त्या जिल्हयातील महाविद्यालयांसाठी जिल्हास्तरावर घेण्यात येईल.
- सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींची संख्या एक दिवसासाठी कमीत कमी **५० ते जास्तीत जास्त् ६०** असणे अपेक्षीत असले. एक दिवसीय दोन प्रशिक्षणासाठी प्रत्येक जिल्हयात एकुण **१०० प्रतिनिधींची** उपस्थिती आवश्यक असेल.
- आपण यशदाच्या वतीने आपणास प्राप्त् निधी प्रत्येक जिल्हासाठी विनियोग करु शकता अथवा जिल्हास्तरावरील कोणत्याही एका महाविद्यालयास देवून सदर प्रशिक्षण खर्च करणेबाबत सूचित करु शकता तथापी निधीचा विनियोग करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.
- सदर जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी लागणारा निधी एकत्रितपणे आपल्या विद्यापीठास यशदाच्या वतीने आपल्या अधिनस्त् **लेखाधिकारी यांचे खातेवर RTGS व्दारे जमा** करण्यात येईल.
- सदर प्रशिक्षण निधी विनियोग केल्यानंतर त्यासदर्भीय **लेखे परिपूर्णरित्या ठेवून त्याबाबतचे विनियोग दाखले विहित नमुन्यात आपल्या स्वाक्षरीत प्रशिक्षणानंतर तात्काळ यशदाला** सादर करणे क्रमप्राप्त राहील.

**सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लागणारा निधी व पूरविण्यात येण-या सुविधा खलील प्रमाणे :-**

- प्रशिक्षण आयोजनासाठी यशदाकडून प्रति प्रशिक्षणार्थी २७५/- रु. प्रमाणे एकुण एका जिल्हयासाठी १०० प्रशिक्षणार्थी X रु. २७५ = रु. २७५००/- याप्रमाणे अदा करण्यात येईल.
- यामध्ये रु. २२५००/- प्रशिक्षण खर्च आणि रु. ५०००/- मानधन खर्च असेल. (आपल्या कार्यालयाचे समन्वयक(नोडल ऑफीसर) आणि इतर सहभागी कर्मचारी (टायपिस्ट आणि मदतनिस) यांचे एकत्रित मानधन)
- "कायदा माहितीचा व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा" हे रु. ३००/- किमतीचे पुस्तक(वाचन साहित्य) देण्यात येईल.
- माहिती अधिकार अधिनियम २००५ या विषयावरील मार्गदर्शिका देण्यात येईल.
- माहिती अधिकार अधिनियम,२००५ या विषयावरील पॉकेट डायरी देण्यात येईल.
- प्रशिक्षण साहित्य (फोल्डर, पेन व पॅड) देण्यात येईल.
- यशदाचे मानद व्याख्याते यांचे मानधन, प्रवास खर्च इत्यादी यशदामार्फत करण्यात येईल.
- प्रशिक्षण साहित्य (फोल्डर, पेन, नोटपॅड व सीडी ) प्रशिक्षण स्थळी यशदामार्फत पोहचविण्यात येईल.
- यशदामार्फत प्रशिक्षण कार्यक्रमांच्या नियोजनाचे वेळापत्रक आपणास कळविण्यात येईल

**आपल्या कार्यालयाकडून पुरवावयाच्या सूविधा :-**

- प्रत्येक दिवशी ५०-५० च्या दोन बॅचेस याप्रमाणे २ दिवसासाठी एकूण १०० प्रशिक्षणार्थी उपस्थित ठेवणे.
- प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन प्रभावी होण्यासाठी व कामात सुसूत्रता येण्याच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्हयातील प्रशिक्षण कार्यक्रमाचे समन्वय अधिकारी (नोडल ऑफीसर) म्हणून आपल्या विद्यापिठाच्या वतीने एक सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करणे व यांचेकडे त्या जिल्हयाच्या कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात येणे.
- प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दिवशी यशदाकडून देण्यात येणा-या रु. २२५००/- या निधीमधून प्रशिक्षणार्थींचे दूपारचे जेवण, दोन वेळचा चहा व्यवस्था करण्यात करणे
- उपलब्ध निधीमधून प्रशिक्षण हॉल व्यवस्था, हॉल मध्ये एल. सी. डी., प्रोजेक्टर, ध्वनी प्रक्षेपक व जनरेटरची सुविधा आयोजित करणे.
- यशदा कडून येणारे एक अधिकारी व दोन व्याख्याते व एक सत्र समन्वयक यांची प्रशिक्षण काळातील निवास, भोजन व स्थानिक वाहन व्यवस्था करणे इत्यादी.

तरी आपले विद्यापीठाअंतर्गत जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी त्याचबरोबर आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व जिल्हयातील अनुदानीत महाविद्यालयांचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रशिक्षण घेणेसाठी मान्यतेबाबतचे पत्र व सोबतच जिल्हानिहाय जनमाहिती अधिकारी व त्यांचे प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या परिपुर्ण यादया दिनांक ३० जुलै २०१६ पर्यन्त यशदाकडे पाठवाव्या ही विनंती. सदर याद्या व प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याबाबतची सहमती/मान्यता आपणाकडून प्राप्त् झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करणे शक्य् होईल.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणी व परिपुर्ण नियोजनास आपले व्यक्तिशः सहकार्य अपेक्षीत असून सदर प्रशिक्षणाची उपयुक्तता व लोकहीतकारक उदिष्टये साध्य् होण्यासाठी आपले योगदान द्यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(मिलिंद टांकसाळे)
संचालक, माहिती अधिकार केंद्र,
यशदा, पुणे.